# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

**महानगरपालिका सचिव कार्यालय,नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-** **दिनांक २८/०८/२०१४.**

नवी मुंबई महानगरपालिकेची <u>सप्टेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक ०५ सप्टेंबर २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता</u> बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील <u>राजमाता जिजाऊ सभागृह</u> येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

३. अग्निशमन विभागासाठी रेस्क्यु साहित्य खरेदी करणेबाबत.

**<u>ठरावाच्या सूचना :</u>**

**४ ते ६. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

(४) आग्रोळी उड्डाणपुल ते आग्रोळी तलावापर्यंत मुख्य रस्त्यांच्या दोन्ही बाजुला पदपथांची निर्मिती करणे. (५) आग्रोळी तलावाच्या आवारात कायमस्वरुपी मुतारी व शौचालय बांधणे. (६) नवी मुंबई शहरामध्ये महानगरपालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या सर्व सुलभ शौचालयांमध्ये विधीसाठी लागणारे शुल्क रदद् करावे तसेच सदर शौचालयांच्या देखरेखीसाठी पालिकेचे कर्मचारी नियुक्त करणे.

**७. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी, यांजकडून :-**

परवाना विभागाकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१३ व ३७६ अन्वये परवाना/परवानगी देण्यात येतात. परंतू सदर परवाना वित्तवर्षानुसार केवळ १ वर्षाकरीता नुतनीकरण करण्यात येते. त्यामुळे संबधित परवाना धारकांस दर वेळी नागरीकांची सनद पुस्तिकेत निर्देशित केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. तद्नंतरच संबधितांचा परवाना नुतनीकरण केले जाते व कागदपत्रांची पुर्तता करणेस विलंब होत असल्याने विहीत वेळेत परवाना नुतनीकरण होत नाही. तरी या अनुषंगाने मनपाने तयार केलेल्या उपविधीत/नियमावलीत बदल करणे.

**८ ते १०. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(८) प्र. क्र. २० मधील गोठिवलीगांव व तळवलीगांव येथे भूस्तरीय व उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे. (९) प्र. क्र. २० मधील गोठिवलीगांव, तळवलीगांव व रबाळेगांव येथे आधुनिक पध्दतीची व्यायामशाळा बांधणे. (१०) प्र. क्र. २० अंतर्गत गोठिवली, रबाळे, तळवली, नोसिलनाका येथील नवतरुणांसाठी खेळाचे मैदान उपलब्ध करुन देणे.

**११ ते १३. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**

(११) प्र. क्र. २२ अडवली-भूतवली, महापे येथील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ४१ चे वाढीव बांधकाम करणे. (१२) संभाजीनगर, वारलीपाडा येथील शाळेची इमारत बांधणे. (१३) प्र. क्र. २२ महापेगांव, अडवली-भूतवलीगांव तसेच संभाजीनगर (वारलीपाडा) येथील उर्वरीत गटारे व पदपथ यांची दुरुस्ती करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक २८ ऑगस्ट २०१४.**